# मनोरुग्णांच्या नातेवाईकांना येणाऱ्या समस्या

**गोविंद लक्ष्मण तांगडे**
संशोधक विद्यार्थी
tangadegovind987@gmail.com
Mb.9637111987

**प्रास्ताविक :**

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात देशाची प्रगती ही अतिशय झपाट्याने होत आहे. आणि या देशाच्या प्रगतीसाठी सुदृढ जनता असणे फार महत्त्वाचे असते. परंतु या अशाच झपाट्याने समाजात परिवर्तन होत आहे आणि यामुळे चांगले बदल तर होतातच पण यासोबत लोकांच्या जीवाला घातक असे वातावरणात बदल होतो व यामुळे लोकांना अनेक आजारांचा सामना करावा लागतो. यात शारीरिक आजार तर होतातच परंतु यासोबत मानसिक आजार देखील होतात. जसे एखाद्या शारीरिक आजार होण्यासाठी जसे शारीरिक, जैविक, रासायनिक बदल होतात तसेच मानसिक आजाराच्या बाबतही होते. मानसिक आरोग्य निरोगी राहणे फार गरजेचे असते. परंतु जर एखाद्या व्यक्तीस आजार झाला तर तो मानसिक रूग्ण म्हणून संबोधल्या जाते.

**''मानसिक रूग्ण''** या एका शब्दाची व्याप्ती फार मोठी आहे. बऱ्याच वेळा आपल्याला मानसिक आजार झाला आहे. हे त्या रूग्णालापन कळत नाही, मेंदूत जेव्हा डोपामाईन या द्रवाचे प्रमाण वाढते त्यावेळी त्याच्या वर्तनात, स्वभावात, राहणीमानात सर्व गोष्टीत बदल दिसून येतो. समाजात आज सुध्दा या रोगाबद्दल म्हणावी तशी जागृती निर्माण नाही झाली. कधी-कधी तो समाज विरोधी वर्तन करतो. अशावेळी रूग्णाच्या नातेवाईकांना नेमका काय निर्णय घ्यावा हे लक्षात येत नाही व अशावेळी चुकून कोणीतरी सांगते की त्यास बाहेरबाधा झाली, करनी केली त्यावेळी नातेवाईक त्या रूग्णास मानसोपचार डॉक्टरकडे नेण्याऐवजी भोंदू बाबाकडे नेतात. परंतु त्या रुग्णास उपचारासाठी गरज आहे असे ज्यावेळी नातेवाईकास लक्षात येते त्यावेळी त्या रूग्णाचा आजार बळावतो अशा वेळी रूग्णास रूग्णालयात उपचारासाठी नेतात. अशा रोग्याला वेळेवर औषधोपचार मिळत नसल्याने. त्या रोग्याला खूप यातना सहन कराव्या लागले या रोगाची अतिशयोक्ती झाली त्या वेळेत या रोग्यास व्यक्ती वेडा किंवा पागल म्हणतात. त्यावेळी मानसिक आजार झाल्यावर जेवढ्या समस्यांना त्या रूग्णांना सामोरे जावे लागते त्याही पेक्षा जास्त त्याच्या नोतवाईकांना सामोरे जावे लागते. त्यात त्यांना मानसिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

ज्या रोग्यास हा रोग होतो त्याच्या घरच्या लोकांना त्या व्यक्तीवर विशेष लक्ष देणे गरजेचे होऊन जाते. बऱ्याचवेळा भावनेच्या भरात एकांतात असा रोगी आपल्या जिवास काहीही करू शकतो. अशा व्यक्तीस एकांतवस भेटला तर तो आत्महत्या किंवा घर सोडून निघुन जाऊ शकतो. काही रोगी हिंसक बनतात अशावेळी तो व्यक्ती घरच्या किंवा त्याच्या बरोबर राहणाऱ्या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला करू शकतात. त्यामुळे अशा व्यक्तीवर त्याच्या पालकांना विशेष लक्ष देणे फार मोठे अवाहन ठरते. अशा व्यक्तींवर घरच्या लोकांना सतत लक्ष द्यावे लागते.

या आजाराचा अतिरेक झाला बऱ्याच वेळा आपण काय करतो आहे. हे आरोग्यास समजत नाही. अशा परिस्थितीत रोगी कोणतेही पाऊल उचलू शकतो. अशा व्यक्तीस झोप लागत नसल्याने, घरच्या लोकांना रात्र-रात्र जागून अशा व्यक्तीवर लक्ष द्यावे लागते. तो कोणावरही शंशयी नजरेने बघत असल्याने त्या व्यक्तीस समजावून सांगणे त्याच्या परिवारासमोर मोठे अवघड काम होऊन बसते. अशा व्यक्ती समजाऊन

सांगीतल्यावरही समजत नसल्याने घरच्या लोकांसमोर अनेक समस्या निर्माण होतात. अशा व्यक्तीची काळजी घेणे हे त्याच्या परिवारा समोर फार मोठी जिम्मेदारी होऊन बसते. त्या व्यक्तीस कितीही समजाऊन सांगितले तरी तो ऐकत नसतो किंवा तो समजण्याच्या मनस्थितीत नसतो, तो काय बोलतो हे त्यालाही समजत नसते. अशा वेळी त्याला समजून घेणे त्याच्याशी प्रेमाने राहणे. याशिवाय त्याच्या परिवारासमोर दुसरा पर्याय नसतो.

वस्तुत: या सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, मनोरुग्णानेक्षा त्यांच्या नातेवाईकांना येणाऱ्या समस्या आणि अडचणी ह्या मोठ्या प्रमाणात आहेत. मनोरुग्ण त्याच्या समस्यने ग्रस्त असतो, परंतु ज्या घरात मनोरुग्ण असतो, त्यांच्या घरांच्याची सर्व स्तरावर मोठी प्रताडणा होत असतांना दिसून येते. साधारणपणे त्यांना येणाऱ्या समस्या संक्षिप्तात खालीलप्रमाणे सांगता येतील.

**नातेवाईकांना येणाऱ्या समस्या :**

मानसिक रूग्णाचा अभ्यास केल्यावर या रूग्णाचा सांभाळ करतांना त्याच्या नातेवाईकांना अनेक समस्या किंवा अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे या नातेवाईकांना रूग्णाला सांभाळणे फार कठीण होत जाते. व यातूनच रूग्णाचा उपचार करतांना त्याला ज्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्या समस्या पुढील प्रमाणे-

**१) आर्थिक समस्या :**

मानसिक रूग्णाच्या नातेवाईकांच्या आर्थिक समस्येचा अभ्यास करतांना असे निदर्शनास येते की, रूग्णाचे नातेवाईक हे जास्त प्रमाणात शेती करणारे व नौकरी करणारे असतील तर त्यांना त्यांची सर्व कामे सोडून रूग्णाचा उपचार करण्यासठी रूग्णासोबत रूग्णालयात यावे लागते. त्यामुळे त्यांच्या कामात अडथळे निर्माण होतात व मिळणाऱ्या उत्पन्नात घट होते. परंतु ज्यावेळी रूग्णाला उपचारासाठी रूग्णालयात आणले जाते त्यावेळी या उपचारासाठी लागणारा खर्च व त्या रूग्णासोबत राहणाऱ्या व्यक्तीचा राहण्याचा, खाण्याचा खर्च देखील लागते व या मिळणाऱ्या उत्पन्नातून हा खर्च भागत नसल्यामुळे त्यांना पैशाची अडचण निर्माण होते व यामुळे त्यांना आर्थिक समस्या उद्‌भवतात.

**२) मानसिक समस्या :**

मानसिक रूग्णाला सांभाळतांना रूग्णास व नातेवाईकास अनेक मानसिक समस्याचा सामना करावा लागतो. कारण या रूग्णाला सांभाळणे फार कठीन असते. हे मानसिक रूग्ण वेगवेगळया आजाराने ग्रस्त असतात. यामुळे हा रूग्ण कधी कसे वर्तन करेल हे सांगता येत नाही. व तसेच रूग्णास जे करू नको असे सांगितले तरी तो तसेच वागतो/वर्तन करतो. सांगितलेले ऐकत नाही. यामुळे नातेवाईकांमध्ये चिडचिडपणा निर्माण होतो. तसेच मानसिक ताण निर्माण होतो व यामुळे रूग्णासोबत नातेवाईकांची मानसिक स्थिती खालावते व तसेच त्यांना मानसिक समस्येचा सामना करावा लागतो.

**३) सामाजिक समस्या :**

समाजामध्ये आजदेखील या मानसिक आजाराविषयी जेवढ्या प्रमाणात जागृकता निर्माण व्हायला पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेली नाही. कारण या आजाराब÷ल समाजात काही गैरसमज निर्माण आहे. याला अंधश्रध्दा, पाप-पुण्याचे फळ आहे असे मानले जाते व हा रूग्ण ज्यापण कुटुंबात आहे. त्या कुटुंबाकडे व त्या रूग्णासोबत राहणाऱ्या व्यक्तींना देखील त्याच नजरेने बघितले जाते व वेड्या सोबत राहणारे सर्वजन वेडे आहेत. अशी एक धारणा त्या लोकांमध्ये निर्माण होते व यामुळे हा व्यक्ती ज्या ठिकाणी काम करत असेल त्या ठिकाणी देखील त्याला रूग्णाच्या आजाराविषयी टोमणे मारले जाते व यामुळे त्याचे मित्र मंडळी त्यांना सार्वजनिक कार्यक्रमात देखील आमंत्रीत करीत नाही, त्यांच्या कुटुंबासोबत बोलत नाही. त्यांच्या मध्ये

कुठल्याच आंतरक्रिया केल्या जात नसतात व यामुळे यांच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केल्या जाते यामुळे या नातेवाईकांना व रूग्णाला सामाजिक समस्येचा सामना करावा लागतो.

**४) आरोग्याची समस्या :**

मानसिक रूग्णाला सांभाळतांना त्याचा उपचार करतांना बऱ्याचवेळा त्याच्या नातेवाईकांना हे लक्षात येत नाही तो स्वत:च्या आरोग्यावर दुर्लक्ष करत आहे. यामुळे त्याच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो व तसेच रूग्णासोबत रूग्णालयात रहावे लागल्याने वेळेवर योग्य आहार मिळत न ाही व तसेच स्वत:च्या आरोग्याची काळजी घेत नाही. यामुळे त्याला वेगवेगळया शारीरिक व्याधी जडतात व यामुळे त्याला अशा आरोग्य विषयक समस्यांचा सामना करावा लागतो.

**५) कौटुंबिक समस्या :**

ज्या कुटुंबातपण असे मानसिक रूग्ण असतात त्या कुटुंबातील वातावरण हे अतिशय चिंताग्रस्त, नैराश्यमय व तणावपूर्ण असते व तसेच रूग्णामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये वाद देखील निर्माण होतात. तसेच काही वेळा या रूग्णामुळे कुटुंब विस्कळीत होण्याच्या मार्गावर असते. त्यामुळे अशा कौटुंबिक समस्या निर्माण होऊन नातेवाईकांना त्यांचा सामना करावा लागतो.

अशाप्रकारे या नातेवाईकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. अशाप्रकारच्या समस्यांना सामोरे जात असतांना त्यांची अनेक मार्गाने मानसिक विवंचना होत असतांना दिसून येते.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

अभ्यास विषयाचे संशोधन करतांना सर्व प्रथम अभ्यास विषाची उिद्दष्टये ठरविणे फार महत्वाचे असते. या शिवाय संशोधन हे प्रभावकारी ठरूच शकत नाही. विषयाच्या उिद्दष्टयामुळे संशोधनाला योग्य ती दिशा मिळत असते. यामुळे या विषयासंबंधीची उिद्दष्टये संशोधकाने पुढील प्रमाणे ठरविली आहेत.

१) मानसिक रूग्णाच्या नातेवाईकांच्या समस्यांचे अध्ययन करणे.
२) रूग्णाच्या नातेवाईकाचे वय, लिंग, जात, राहण्याचे ठिकाण इ. विषयी अध्ययन करणे.
३) रूग्णांच्या नातेवाईकांमध्ये रूग्णाच्या उपचारासाठी जागृकता आहे का? यांचे संशोधन करणे.
४) रूग्णाच्या नातेवाईकांच्या विविध समस्यांचे अवलोकन करणे.
५) रूग्णाच्या नातेवाईकांचा आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.
६) मानसिक रूग्णामुळे त्याच्या कुटुंबियावर होणारे सामाजिक परिणाम अभ्यासणे.
७) आजची आधुनिकता वैज्ञानिक शोध व शैक्षणिक प्रगती मानसिक आजाराला अंधश्रध्देपासून दूर नेण्यात यशस्वी ठरली का ? हे अभ्यासणे
८) मनोरूग्णाच्या नातेवाईकांना येणाऱ्या अडचणींची नोंद घेऊन, त्याची सविस्तर मांडणी करणे.

**अभ्यास विषयाची गृहितकृत्ये :**

संशोधन पध्दतीचा अभ्यास करावयाचा म्हणजे अगोदर अभ्यास विषयाची निवड करावी लागते आणि या संबंधित विषयासंबंधी पूर्वज्ञान, असणे फार गरजेचे असते आणि या ज्ञानाच्या आधारे संशोधक या विषयाचे सामान्य अनुमान अथवा सिध्दांत बांधतो आणि या गृहीतकृत्याच्या आधारे संशोधनकार्यास निश्चित दिशा मिळते. यावरून खालील गृहितकृ त्ये ही अभ्यास विषयासाठी उपयुक्त ठरतात.

१) मानसिक रूग्णाच्या उपचारावर रूग्णाच्या नातेवाईकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते.
२) मानसिक आजाराच्या उपचारासंबंधी आजही लोकांच्या मनात अज्ञान व अंधश्रध्दा आहे.
३) मानसिक रूग्णामुळे त्यांच्या नातेवाईकांना अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते.

४) मानसिक रूग्णांला सांभळतांना रूग्णाच्या नातेवाईकांना मानसिक समस्या निर्माण होतात.

५) मानसिक रूग्ण होण्यात बेकारी, अपयश, कौटुंबिक ताण-तणाव, शैक्षणिक ताण-तणाव हे घटक महत्वाची भूमिका बजावतात.

६) मानसिक रोग्यांना प्रेम, आपूलकी, जिव्हाळा व सहकार्य केले तर त्याच्या अर्वरित आयुष्यात सकारात्मक बदल होईल.

**निष्कर्ष :**

बदलत्या जीवनशैलीचा परिणाम मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. सतत काही तरी नवीन करण्याची धडपड असल्याने मानवी आरोग्य ढासाळत चालले आहे. त्याचा थेट परिणाम मनावर होत असल्याने मनुष्याची सहनशक्ती कमी झाल्याने मानसिक रुग्णांचे प्रमाण वाढलेले आहे. मनोरुग्ण हा समाजाचा एक भाग आहे, असे असतांनाही मानसिक रुग्ण समाजाच्या मुख्य धोरणापासून दूर राहतो. उपचार घेत असलेल्या रुग्णांचे नातेवाईकही त्यांची अवहेलना करतांना दिसतात. ही बाब लक्षात घेऊन शासनाने त्यांच्यासाठी विविध उपाय योजना शासन स्थरावर राबविण्यात येत आहे. याचा लाभ संबंधीत रुग्णाला मिळावयास हवा. यासाठी नातेवाईकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्याकडे या मानसिक आजाराकडे फारसे लक्ष दिले जात नाहीत, याबाबत गैरसमजुती पुष्कळ आहे, शिवाय यावर इलाज करणाऱ्या डॉक्टरांची संख्या फारच तोकडी आहे. त्यामुळे या आजाराकडे अद्याप म्हणावे तितके लक्ष दिले जात नाही. ही मोठी शोकांतीका आहे. खरे तर माणसाला अनेक प्रकारचे मनोविकार सतावत असतात. विशेषत: सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आणि स्पर्धेच्या जीवनात या मनोविकारांचे अनेक प्रकार लोकांमध्ये जडायला लागले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे लोकांची आपपासातले भावनांचे देणेघेणे कमी होत आहे. ग्रामीण भागात लोक गरीब असतील परंतु ते परस्परांना धरुन असतात आणि आपल्या मनातील तणाव ते सहजपणे दुसऱ्यांना बोलुन दाखविता. केवळ बोलुन दाखविल्याने सुध्दा मनावरचे दडपण कमी होत असते. शहरात मात्र प्रत्येकजन आपल्या मनातील भावना दुसऱ्यांना बोलून दाखवत नाही. आपल्या मनाची कमतरता इतरांना कळाली तर आपणास कमीपणा येईल आणि आपली प्रतिष्ठा जाईल असे प्रत्येकाला वाटत असते. त्यामुळे कोणी कोणाच्या भानगडीत पडत नाही आणि मनावरचे अनेक दडपणे घेऊन लोक जगत असतात. त्याचे परिणाम त्यांच्या मनावर ही होतात आणि शरीरिरावर होतात. अशा विकारांमध्ये डिप्रेशन आणि लैंगिक व्यवहारातील असाधारण निद्रा नाश इत्यादी विकारांचा प्रामुख्याने समावेश होतो. नैराश्य आणि तिव्र डोके दुखी ही याच विकारांची अपत्य आहेत.

आजच्या दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येक मनुष्याच्या मागे असणाऱ्या विविध समस्या, वाढलेला कामाचा व्याप आणि त्यातून निर्माण होणारी मानसाची विचलीत मानसिकता, मानसाचे असणारे अस्थिर मन, मनाचे विविध आजार, अपसामान्य वर्तन, मनोविकृती, आत्महत्या, व्यसनाधिनता आणि यातून त्याचा समाजावर होणारा विघातक परिणाम हा समाजाच्या, राष्ट्राच्या आणि वैश्विक स्तरावर सुध्दा एक चिंतेचा विषय झालेला आहे. आज सर्वच लोक मानसिक विकारांनी ग्रस्त असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) सामाजिक संशोधन तत्वे व पध्दती - प्रा. रा.ना. घाटोळे

२) मनात - डॉ. अच्युत गोडबोले.

३) मानसशास्त्र - सौ. विजया हलकारे

४) मनोविकारांचा मागोवा - डॉ. श्रीकांत जोशी

५) मानसिक स्वास्थ्य - डॉ. ए. ए. कादरी

६) औरंगाबाद शहरातील भौगोलिक माहिती - स्टडी सर्कल